नि.फौ.के. नं. ५०/२०१७
महाराष्ट्र शासन वि.आनंद वेर्गुलेकर
निशाण क्र. ४६

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव –** विनायक सुरेश शिरगावकर,

**वय –** ३४ वर्षे, **व्यवसाय** – व्यापार,

**राहणार –** संगमेश्वर, रोहीदासवाडी, नावडी, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी

**अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहा. सरकारी अभियोक्ता कु. एस. आर. वनकर यांचेकडून –**

**०१.** मी आरोपीला ओळखतो. मराठे साहेबांनी त्याची ओळख करुन दिली होती. मराठे साहेब हे माझे मित्र होते. मी गाडी वाहतूकीचा व्यवसाय करीत होतो. त्या संदर्भाने माझी आरोपीशी ओळख झाली होती. माझ्या वडीलांचे चप्पल दुरुस्तीचे दुकान होते. सोमा कानसे हे सदर दुकानात येत असत. तसेच त्यांचा पुतण्या विनायक कानसे हा पिग्मी गोळा करण्याचे काम करीत होता. तो सुध्दा दुकानामध्ये येत होता. त्यामुळे त्या दोघांसोबत माझी ओळख होती.

**०२.** एप्रिल–२०१४ मध्ये आरोपीने त्याच्यासाठी आंबा बागेच्या फवारणीसाठी पैशांची आवश्यकता असल्याचे मला सांगितले होते व कोणा कडून पैशांची व्यवसथा होते का हे बघण्यासाठी सांगितले होते. त्यामुळे मी कानसे यांच्याकडे पैशांची व्यवस्था होते का हे विचारण्यासाठी गेलो होतो. रत्नागिरी रेल्वे स्थानकाजवळ आरोपीचे घर असून तेथे मी गेलो होतो. त्यावेळी कानसे यांनी माझ्यासमक्ष आरोपीला रक्कम रुपये १,००,०००/– दिले होते.

**०३.** त्यानंतर पोलीस ठाण्यामध्ये अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला होता व मला बोलाविण्यात आले होते. तेथे मी घडलेली सर्व हकीगत सांगितली. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एम. एम. जाधव यांचेकडून</u> –**

०४. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने आरोपीला आंबा फवारणीच्या व्यवहारासाठी माझ्यासमक्ष रक्कम रुपये १,००,०००/– रुपये दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझ्यासमक्ष फिर्यादीकडून 'नोकरीला लावतो' म्हणून पैसे घेतलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीकडून घेतलेली रक्कम आरोपीने माझ्यासमक्ष फिर्यादीला परत केली आहे. सदर रक्कम फिर्यादीला परत केलेबाबत मला माहिती नाही.

०५. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.06.20 16:41:24 +0530

**(श्रीमती आर. आर. कुलकर्णी)**

दिनांक २०.०६.२०२५

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 20/06/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 20/06/2025 |
| Evidence uploaded on | :- | 20/06/2025 |